।। १ ओंकार सतिगुर प्रसादि ।।

## पुस्तकांची यादी

१. जपुजीसाहेब
२. नामा म्हणे
३. ऐक रे मना
४. सुखमणी साहेब
५. म्हणे कबीर
६. औंकार आणि सिध गोसटि

मूल्य : प्रेम आणि श्रद्धा

७. श्री गुरुग्रंथसाहिब संपूर्ण मराठी भावानुवाद संपूर्ण ७ खंडांमध्ये उपलब्ध.

या पुस्तकात संपूर्ण गुरुवाणी, कठीण शब्दांचे अर्थ व भावानुवाद. मजबूत बाईंडिंग, प्लॅस्टिक कव्हरसहित.

मूल्य : १५००/- रू.

- पुस्तक मिळण्याचे ठिकाण -

अध्यक्ष गुरनामसिंघ होरा
मोबा. : ९३२५६३६१३६
गुरुद्वारा श्री गुरुसिंघ सभा, पूना.
४३१/४३२ गणेशपेठ,
दगडी नागोबाशेजारी, पुणे २.
मोबा. : ०२० २६१२१६३३

तारासिंघ गु. गोरोवाडा
मोबा. : ९८२२८६७७७८
राजमुद्रा गृहरचना,
सी ब्लॉक १ समोर.
१०३७, धनकवडी, पुणे ४११०४३.


# शीख धर्माचे उपदेश व जीवन संदेश

संत सज्जनांच्या विचारांचा कधी लोप होत नाही. ही वचने कळीकाळालाही पुरून उरणारी आहेत. या संतसज्जनांच्या आशीर्वादावरच आजच्या युगातही खऱ्या अर्थानं जगण्याची ताकद मिळत आहे. पण; प्रत्यक्षात आज आपण काय पाहात आहोत? आज एकूण विश्वाचे चित्र समोर आणले तर अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार स्वार्थ आणि दहशतवाद आपणास क्षणाक्षणाला वाढताना दिसतो. जागोजागी निरपराध लोकांची हत्या होताना दिसते. या दहशतवादी वृत्तीचा बिमोड करण्याची गरज आज निर्माण झालेली आहे. माणसा माणसात वाढत जाणारे अंतर कमी करून एकमेकांत शांती, दया, प्रेम वाढविण्याची नितांत गरज आहे.

कारण आज या यंत्रयुगात माणूस यंत्रासारखा वागत आहे. प्रत्येकाचे आयुष्य धावपळीचे झाले आहे. आपला धर्म, आपला समाज, आपले राष्ट्र यांच्याकडे लक्ष द्यायला माणसाजवळ वेळच नाही. प्रत्येकाचा सारा वेळ मौजमजा आणि दैहिक सुखासाठी खर्च होताना दिसत आहे. मानवता धर्माचा आणि खऱ्या मानवी आयुष्याचा आपणास विसर पडत चालला आहे यात तिळमात्र शंका नाही. हा विसर पडणे म्हणजेच आपण खऱ्या धर्मापासून आणि मानवी सत्यापासून दूर जात आहोत, आणि धर्माच्या नावाखाली खऱ्या परमेश्वराचीच फसवणूक करीत आहोत की काय? अशी मनात शंका येते.

मी धर्मविचाराला मानणारा माणूस आहे. माझ्या धर्माचे आचरण करणारा आणि मानवी धर्माचा कल्याणकारी चिंतन करणारा, माझ्या शीख धर्माचे पालन करणारा तुमचा एक बंधू आहे.

### धर्म म्हणजे काय?

धर्म म्हणजे जे आपण धारण करतो संस्कार ! जन्मापासून जी संस्काराची विचारधारणा आपल्या मनात रुजवितो व तसे आपण आचरण करतो तो आपला धर्म होय. धर्म म्हणजे पवित्र विचारांचे एक बंधन, धर्म म्हणजे आदर्श नियमांचे शुद्ध बंधन, धर्म म्हणजे सत्याचा प्रकाशमय मार्ग दाखविणारे एक वंदनीय दैवत. समाजात कसे वागावे यासाठी आदर्श आणि मूल्याधिष्ठित विचारांना एकत्रित

करून समाजाला घालून दिलेले नियम म्हणजे धर्म.

मानवी कल्याणासाठी आदर्श आणि संदेश धर्माचाच एक भाग आहे. या विश्वाची निर्मिती करणाऱ्या दिव्य शक्तीला शरण जाऊन त्या शक्तीला सर्वश्रेष्ठ मानणे आणि ईश्वराची भक्ती करून गरिबांची सेवा करणे, निराधारांना आधार देणे, स्वार्थाचा मार्ग सोडून नि:स्वार्थीपणाने दुसऱ्यांची सेवा करणे आणि मुख्य म्हणजे, आपण स्वत:हून माणुसकीच्या नात्याने या साऱ्यांवर, अशा समाजावर मूल्यांचे संस्कार करणे हीच कोणत्याही धर्माची धारणा असते. शीख धर्मातही अशाच महान विचारांना खूप महत्त्व दिलेले आहे. म्हणूनच शीख धर्मगुरुंनी अशा आदर्श मूल्यांचे आचरण करून असा आदर्श समाज घडविण्याचा प्रयत्न सातत्याने केलेला आहे. करत आहे व समाजाला सुपंथ दाखविलेला आहे.

जगात अनेक धर्म, जाती, पंथ आहेत. परमेश्वरी इच्छेने त्यात अनेक आदर्श विभूती अवतरल्या. ज्यांनी मानवतेच्या कल्याणासाठी व प्राणिमात्रांना या भवसागरातून मोक्ष मिळवून देण्यासाठी, जन्म-मृत्यूचक्रातून बाहेर पडण्यासाठी व खऱ्या अर्थाने परमेश्वरचरणी शरणागत होण्यासाठी, परंपरेने चालत आलेल्या रुढींमध्ये काळाच्या गरजेनुसार त्यांनी जो एक नवीन जीवन संदेश दिला. त्यालाच धर्म हे नाव दिले; परंतु शीख धर्माच्या सर्व वैशिष्ट्यांकडे पाहण्यापूर्वी त्या काळाची परिस्थिती पाहणे आवश्यक आहे.

सहाव्या व सातव्या शतकापासून परकीय आक्रमणकारी भारतात आले व भारतीय संस्कृतीचाच एक भाग म्हणून इथे राहिले. पण; बाराव्या, तेराव्या शतकापासून आलेल्या इस्लाम धर्माने मात्र आपल्या हिंदू धर्माचा समूळ नाश करून हिंदू धर्मियांची श्रद्धास्थाने समूळ नष्ट केली. देवदेवतांच्या मूर्ती भग्न केल्या. मंदीरे व मंदिरातील शिल्पांचे सौंदर्य विद्रूप केले. स्त्रिया बाटविल्या. इथली संपत्ती लुटून भारताचे वैभव संपविण्याचा प्रयत्न केला. हे सर्व ऐतिहासिक सत्य आपण अभ्यासले असेलच. या अशा आपत्तीत सामाजिक व राजनैतिक परिस्थितीमध्ये गुरुनानक देवांनी हिंदू धर्माच्या संरक्षणाचा विडा उचलला. म्हणूनच सुप्रसिद्ध शायर डॉ. मुहम्मद इकबाल म्हणतात.

**''फिर उठी आखिर सदा तौहीद की पंजाब से**
**हिन्द को इक मर्दे-काबिल ने जगाया ख्वाब से ।।''**

तत्कालिन परिस्थितीमध्ये परकिय आक्रमणाची भीती नव्हती; तर



स्वकियांचे अत्याचार हा एक मोठा सामाजिक अडथळा होता. ब्राम्हण, ब्राम्हणेतर वाद, समाजात पसरलेला वाळवीसारखा पोखरणाऱ्या या वादाबरोबरच जाती-उपजातीतील भेद, स्पृश्य-अस्पृश्य भेद, गरीब आणि धनवान ही अशी काही उदाहरणे आहेत. ज्यामध्ये सर्वसाधारण मनुष्य बळी पडत होता. त्यामुळे समाजाची संपूर्ण अधोगती झाली. खरं तर ती आजही आहेच.

अशा अंध:कारमय युगात गुरुनानकांच्या रुपाने एक सत्याचा उदय झाला. या वंदनीय महापुरुषाने माणसाला माणुसकीचा हक्क देण्यासाठी व विशेषत: स्त्रियांना सन्मानाने जगविण्यासाठी माणुसकीच्या नावाखाली काळिमा फासणाऱ्या घटना मोडून काढण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य दान केले. क्षण न् क्षण यासाठी, ह्या महात्म्याने आमरण जागरण केले हे आम्ही तुम्ही विसरता कामा नये.

गुरुनानक देवांनी कुमार्गी जनतेला सन्मार्ग दाखविला व 'एक ओंकाराच्या'' छत्राखाली सर्वांना आणून एकाच परमेश्वराची प्रतिष्ठापना केली. जनतेला एका निर्गुण निराकार ब्रम्हाची भक्ती करण्यास प्रेरित केले. स्वत:च्या डोळ्यांनी आपली श्रद्धास्थाने उध्वस्त, जमीनदोस्त होताना पाहिलेल्या हिंदू जनतेचा गुरुनानकांवरचा विश्वास वाढू लागला. त्यांचे सत्य विचार या संभ्रमात सापडलेल्या जनांना पटू लागले व पापाचे अंध:कारमय साम्राज्य प्रकाशात झळकू लागले. अशा नव्या विचारांचा प्रसार करत गुरुनानकांनी विखुरलेल्या जनतेला एकसंध करून शीख धर्माचा पाया घातला.

### शीख धर्माचे संदेश व उपदेश

शीख समाज निर्गुण, निराकार परमेश्वराचा उपासक आहे. सृष्टीतील मानवतेची सेवा करणे, प्राणिमात्रांवर प्रेम व दया करणे. आपल्या गुरुंचा, गुरुंच्या वाणीचा सन्मान व पालन करणे व याच खऱ्या मार्गाने वागणे. कष्टाची कमाई म्हणजे, सत्यपणे केलेले कष्ट होय. सर्व धर्मातील लोकांशी मिळून मिसळून राहणे. सत्संगत म्हणजेच चांगल्यांची संगत करणे. परमेश्वराचे नामस्मरण करणे.

आपल्या गुरुंकडून विधीवत अमृताची दीक्षा घेऊन समाजाचा व मानवतेचा सन्मान करणे. शीख पंथातील शिखांनी पाच ककार म्हणजे कडा, कंघा, केस, कृपाण व कच्छा यांचा सदैव सन्मान व आदर करणे व याला सतत जवळ बाळगणे हे शीख धर्माचे मूलभूत सिद्धांत आहेत. गोर गरिबांच्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी प्राणांची बाजी लावणे. कुठल्या प्रकारे जातिभेद, वर्णभेद,

संप्रदाय भेद न ठेवता आपण सर्व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत यावर पूर्ण श्रद्धा ठेवणे. कोणत्याही व्यसनापासून दूर राहून सर्वांशी बंधुत्वभावाने वागणे हे प्रत्येक शीखाचे आद्य कर्तव्य आहे.

शीख धर्मामध्ये गृहस्थाश्रमावर अपार श्रद्धा आहे. गृहस्थाश्रमात राहून त्याचे सर्व नियम व सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असतानाच परमेश्वराचे नामस्मरण करणे यातच खरा मोक्ष आहे.

ही शिकवण शीखांच्या गुरुंकडून त्यांना मिळालेला वारसा आहे आणि म्हणूनच आज भारतामध्ये एकूण लोकसंख्येच्या फक्त दोन टक्के शीख समाज असूनही एक आदर्श गृहस्थ म्हणून शीख परिवाराकडे पाहिले जाते. पुन्हा एकदा सांगतो संपूर्ण प्राणिमात्रांच्या कल्याणाची कामना करणे व मानव समाजातून वैर, विरोध, द्वेष, ईर्षा नष्ट करणे हाच शीख धर्माचा खरा उद्देश आणि संदेश आहे.

शीख धर्माचे एकूण दहा गुरु झाले त्यापैकी पाचवे गुरु, गुरु अरजनदेवजी यांनी पूर्वी होऊन गेलेले चार गुरु यांनी वेगवेगळ्या साधू संताशी व जनतेशी केलेला संवाद उपदेश, संदेश व प्रवचने ही सर्व वाणी एकत्रित करून आदि गुरुग्रंथसाहेबाची रचना केली; आणि त्यांच्याही पूर्वी होऊन गेलेले मध्यकालीन भारतीय संतांचे व भक्तांचे आणि थोरांचे विचार एकत्रित केले.

परमेश्वर एक आहे व तो निर्गुण निराकार आहे असे मानणाऱ्या सर्व साधू संतांची व भक्तांची वाणी एकत्रित करून त्यांची जात, वर्ण, संप्रदाय व कुलांचा विचार न करता त्या सर्व संतांची वाणी आपल्य ग्रंथसाहेबामध्ये एकत्रित करून शिरोमणी ग्रंथाची निर्मिती केली व त्या ग्रंथास आपल्या सिंहासनापेक्षा सुद्धा उंच आसनावर विराजमान करून त्याचा सन्मान व सत्कार करून त्याच्यापुढे स्वयं नतमस्तक झाले.

श्रीगुरुग्रंथ साहेबाची सुरुवात शीख धर्माच्या मूलमंत्राने झालेली आहे. मूलमंत्र हा गुरुनानकदेव यांच्याच संपूर्णतया वाणीचे सारमृत आहे. तो मूल मंत्र असा आहे.

**एक ओंकार, सतिनामु करता पुरुखु निरभउ निर्वैर,**
**अकाल मूरत अजूनी सैभं गुरप्रसादि ।।**

(श्री गु. ग्रं. सा. पान १)



गुरुनानक यांनी ॐ या शब्दापुढे '१' हा अंक घालून सर्व प्राणिमात्राला एकाच छत्राखाली आणून आपण सर्व एकच आहोत व एकाच परमेश्वराची लेकरे आहोत. हा भाव सर्वात आधी रुजवला. गुरुजींनी आपल्या या विचारांना अभिव्यक्त करण्यासाठी परंपरेने चालत आलेल्या अक्षरांचा उपयोग न करता अंकाचा उपयोग केला. आणि ही त्यांची स्वयंनिर्मित विशेषतः मानली गेली आहे. आदिग्रंथाची सुरुवातीला '१' येतो व तेव्हा १ ओंकार सुरू होतो. १ अंक ब्रम्हाकडे निर्देश करतो आणि सांगतो की, दोन नाही दोन असूच शकत नाही. याप्रमाणे '१' हा संकेत करतो की, त्याचे एक रूप आहे परंतु नावे अनेक आहेत. समस्त विश्व त्या एक ब्रम्हात सामावले गेलेले आहे. जसे एकाच धाग्यात सहस्त्र मणी गुंफले जातात तसेच एका ब्रम्हांडात संपूर्ण विश्व गुंफले आहे.

आजपर्यंत निर्मित झालेल्या सर्व धार्मिक ग्रंथांमध्ये फक्त ज्या धर्माचा तो ग्रंथ आहे व त्याच समाजाचे व साधुसंतांचे विचार त्यात मांडलेले असतात परंतु जगाच्या पाठीवर हा एकमेव ''श्री गुरुग्रंथसाहेब' आहे जो धर्म, सर्व जाती सर्व वर्ण व संप्रदायाच्या संतांना आपल्याबरोबर घेऊन मानव धर्माचा प्रचार करीत आहे.

आपल्याला माहीत असेल तरीही सांगतो, महाराष्ट्राचे संत नामदेवजी हे शिंपी जातीचे होते. भक्त कबीरजी उत्तर प्रदेशात राहणारे जे जातीचे विणकर होते. भक्त रविदासजी गुजराथ प्रांतातील व जातीने चांभार होते. आपल्या महाराष्ट्रातील सोलापुरातील भक्त त्रिलोकचनजी, पंजाबचे शेख फरीदजी जे मुसलमान जातीचे होते आणि कर्मवंशात कसाई जातीत होते. बनारसमधील रामानंद गोसावी, राजस्थानमधील भक्त धन्नाजी, बंगालचे भक्त जयदेवजी हे सर्व ब्राम्हण कुळीचे होते. भक्त भिखनजी जे मुस्लीम होते. भक्त सेनजी जातीने न्हावी होते. भक्त पीपाजी, भक्त सदनाजी व सूरदासजी हे सर्व त्या काळातील नामांकित भक्त मानले गेलेले आहेत.

अशा एकूण छत्तीस महान विभूतींची वाणी या श्रीगुरुग्रंथसाहेबमध्ये सामावलेली आहे. जेव्हा आम्ही श्रीगुरुग्रंथसाहेबांपुढे नतमस्तक होतो तेव्हा आपोआपच या भक्तांच्या व संतांच्या चरणी आमचा माथा नतमस्तक होतो. जगाच्या पाठीवर हा एकमेव श्रीगुरुग्रंथसाहेब असा आहे ज्यामध्ये सर्व जाती-जमातीचे, संतांचे, पीरांचे विचार संकलित आहेत. म्हणूनच हा श्रीगुरुग्रंथसाहेब

केवळ शीख धर्मातील लोकांचा ठेवा नसून जगातील सर्व मानव धर्माचा श्रीगुरुग्रंथसाहेब आहे. श्रीगुरुग्रंथसाहेब सर्व धर्म समभावाचा आदर करतो. सर्व धर्म समादर या शब्दाची सार्थकता यात आहे. असा हा श्रीगुरुग्रंथसाहेब ज्यांनी भारतीय संस्कृतीचा वारसा इतकी वर्षे जतन करून ठेवला. मला असे वाटते की, आणखी यासाठी कोणत्याही स्पष्टीकरणाची गरज नाही. शीख समाज आपल्या गुरुच्या आदेशानुसार वागतो, सर्व धर्माचा आदर व सन्मान करतो. मूळ श्री गुरुग्रंथसाहेब गुरुमुखी लिपीमध्ये लिहिला आहे.

''श्रीगुरुग्रंथसाहेब'' – उपदेश व संदेशाचे काही दाखले :

**''अवलि अलह नूरु अपाइआ कुदरति दे सभ बंदे**

**एक नूर ते सभु जगु उपजिआ, कउन भले को मंदे''**

(श्री गु. ग्रं. पा. १३४९)

– या जगात सर्वप्रथम स्वयंभू परमेश्वराचे प्रकाशमान झाले आणि परमेश्वराची या प्रकृतीद्वारे हे प्राणिमात्रांचे जन्म झाले. हे सर्व विश्व एकाच परमेश्वराने निर्माण केलेले असल्याने कोण चांगले आणि कोण वाईट असल्याचा उलगडा करता येणार नाही. चांगले आणि वाईट म्हणजे, पुण्य आणि पाप हे तर ज्याच्या त्याच्या कर्मावर अवलंबून आहे. सर्वांमध्ये अल्लाह किंवा राम याचेच रूप आहे. सर्व आत्म्यामध्ये एकच परमात्मा निवास करत आहे.

**''एक पिता एकस के हम बालक''**

आम्ही सर्व प्राणिमात्र एकाच पित्याची लेकरे आहोत.

स्त्री जातीविषयी गुरुनानक देव जी सांगतात,

**''सो किउ मंदा आखीए, जित जंमहि राजान''**

(श्री गु. ग्रं. सा. पान ४७३)

अरे ! त्या स्त्री जातीला कमी कसे लेखावे ! स्त्री ही तर सर्व जगताची माता आहे. जगत् जननी आहे. जिच्यामुळे या संसाराला गती मिळते आणि या मातांमुळे तर अनेक साधू संतांना व राजेमहाराजांना जन्म दिलेला आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मध्यकालीन इतर साधुसंतांनी, त्यात कबीरजीही आले. या सर्वांनी स्त्रीची निंदाच केलेली आहे. तिला हीन लेखले गेल्यामुळे संपूर्ण समाज रचनेतील अर्धा भाग आपोआपच निकामी झाला परंतु गुरुनानकांनी या उपेक्षित



स्त्रीला तिचे यथायोग्य स्थान प्राप्त करून दिले. गुरुनानक हे एकमेव असे संतपुरुष, ज्यांनी त्या काळापासून स्त्री पुरुष समानतेचा पाया रोवला.

**''खालिक खलक, खलक माहि खातिक, पूर रहियो सर्व ठाई''**

(श्री गु.ग्रं.सा.पान १३४९)

सर्व आत्म्यात परमेश्वर आहे व सर्व जनांमध्ये जनार्दन आहे आणि सर्व जनांना निर्माण करणारा एकमेव जनार्दनच आहे व तो या साऱ्यांमध्ये एकरूप आहे.

हिंदू धर्मामध्ये जानवे घालण्याची प्रथा आहे. आपल्याकडे मुंजबंधनाचे केले जातात. गुरुनानक म्हणतात जानवे फक्त दोऱ्याचे नसावे– मग ते कसे असावे ? या विषयी गुरुग्रंथसाहेबमध्ये सांगितले आहे,

**''दइआ कपाह संतोखु सूतु, जतु गंडी सतु वटु**

**एहु जनेऊ जीअ का, हई ता पांडे घतु ।।**

**ना एहु तुटै न मलु लगे, न एहु जले न जाइ**

**धनु सू माणस नानका, जो गलि चले पाइ ।।''**

(श्री गु. ग्रं. सा. पान ४७१)

गुरुनानकांनी जानवे घालावयास नकार दिला. ते म्हणतात, ''अहो, पंडितांनो, तुम्ही दयारूपी कापूस घेऊन त्याचे समाधानरूपी असे सूत कातून त्यावर सत्याचे पिळ घाला, पंडितांनो, जर आपल्याकडे असे जानवे असेल तर मला तुम्ही ते घालावे जे कधी तुटणार नाही, जे कधी मळणार नाही, अग्नीही त्याला जाळू शकणार नाही. धन्य धन्य ती माणसे, ज्यांनी अशा प्रकारच्या जानव्याचा अंगिकार केला.

याचा नेमका भावार्थ असा आहे. माणसांनी देखाव्यापासून, बाह्य गोष्टींवर भर न देता दूर राहावे. सत्यावर कायम राहून मनात दया, समाधान, ब्रह्मचर्याचे व्रत आणि सत्य विचारांचे अलंकार घालावे. जे कधीही नाहीसे, नष्ट होणार नाहीत. खराब होणार नाहीत आणि कोणतीही शक्ती त्यांना तुमच्या हृदयापासून दूर करणार नाही. गुरुनानकजी फरमान म्हणजे आदेश करतात, धन्य त्या व्यक्ती आहेत. ज्यांनी अशा प्रकारचे जानवी (अलंकार) घातलेले आहत. खरे पाहिले तर हेच मानवी श्रृंगार आहेत.

जातीविषयी उपदेश

खत्री, ब्राह्मण, शूद्र, वैष्ण, उपदेश चहूवर्णा को सांझा

(श्री गु.ग्रं.सा. ७४८)

(क्षत्रिय, ब्राह्मण, शूद्र व वैष्णव या सर्वांना एकच उपदेश आहे जात वेगळी असली तरी उपदेश वेगळा नाही.)

''बाणी गुरु, गुरु है बाणी, विचिबाणी अमृत सारे
गुरु बाणी कहै सेवकु जनु मानै, परतखि गुरु निसतारे ।।''

(श्री गु. ग्रं. सा. पान ९८२)

गुरुची वाणी म्हणजेच गुरु आणि गुरु म्हणजेच त्यांची वाणी. या वाणीमध्ये सर्व अमृत म्हणजे सुखच सामावलेले आहे. जशी गुरुची वाणी सांगेल व सेवक त्या वाणीचा आदर सत्कार करून त्याचप्रमाणे आपले वागणे ठेवत असेल तर खरोखरच गुरु परमेश्वर प्रत्यक्ष अवतार घेऊन अशा सेवकांचे सर्व कार्य सिद्धीस नेत असतो.

नश्वर देहाविषयी गुरुवाणी म्हणते,

''पांच तत को तनु रचिओ, जानहु चतुर सुजान
जिह ते उपजिओ नानका, लीन ताही मैं मानु''

(श्री गु. ग्रं. सा. पान १४२७)

हे मानवा, तुझे शरीर पाच तत्त्वांचे आहे. हे शरीर ज्या तत्त्वांमधून निर्माण झाले आहेत त्या तत्त्वामध्येच विलय, विसर्जित होणार आहे हे तू जाणून घे.

मानव जन्माबद्दल गुरुजी सांगतात–

''मानव जन्म दुर्लभ है, होत न बारंबार
ज्यों फल पक भौहे गिरे, बहुर न लागे डार।''

(श्री गु.ग्रं.सा.)

ज्याप्रमाणे पिकलेले फळ तुटून पुन्हा फांदीला लागत नाही, त्याचप्रमाणे हे मानवा, तुला मिळालेला मानव जन्म पुन्हा प्राप्त होणार नाही. तू याच जन्मी प्रभूचे नामस्मरण कर व चौऱ्यांशी लक्ष योनीच्या भ्रमणातून मुक्त हो. या मायावी संसारातून मुक्त हो.



नामस्मरण

''नाम खुमारी नानक चढी रहे दिन रात''

हे प्रभो, तुझ्या नामाचा नशा, नामाची धुंदी सदैव दिवस रात्र माझ्या मस्तकात राहू दे.

''गुण गोबिंद गाइउ नहीं जनम अकारथ कीन।।
कहो नानक भज हरि मना, जिह बिधि जल कउ मीन''

(श्री गु.ग्रं.सा.पान १४२६)

मासा पाण्याविना आपले प्राण गमावतो. हे मानवा, त्याचप्रमाणे तुझी ओढ परमेश्वराच्या नामस्मरणाकडे असली पाहिजे.

आत्मशुद्धी

भरिऐ हथ पैर तन देह, पाणी धोते उतरस खेह ।।
मूत पलीनी कपड होइ देह, साबून लई औ उइ धोइ।
भरीऐ मति पापा कै संग, उह धोपै नावें कै रंग ।।

(श्री गु. ग्रं. सा. पान ४)

अरे मानवा, जर मातीने आपले हात, पाय, शरीर मलिन झाले तर ते पाण्याने धुता येतात. मलमूत्रांनी भरलेले कपडे साबणाने साफ करता येतात पण, पापाने भ्रष्ट झालेली बुद्धी व विचार हे प्रभो, नामस्मरणानेच स्वच्छ होतात. प्रभुजीच्या जपानेच आत्म्याचा रंग उजळत जातो.

''एक घडी, आधी घडी, आधी हूं अति आध
संतन सेती गोष्टी जो कीनो सो लाभ''

(श्री गु.ग्रं.सा.पान १३७७)

हे सत्पुरुषा, प्रभू परमेश्वराचे नामस्मरण कर, जी वेळ मिळेल त्या वेळेत त्याचे स्मरण कर. नामस्मरणाला वेळेची मर्यादा नाही. अगदी काही क्षण का मिळेना त्याचे स्मरण कर आणि तू संतसंगतीत खर्च केलेला वेळ तुझ्या जजीवनातील हेच लाभदायी क्षण ठरतील.

रामनामाविषयी संत नामदेवजी म्हणतात :–

''देवा पाहन तारिले, राम कहत जन कस न तरे।।''

(श्री गु. ग्रं. सा.पान ३४५)

हे मानवा ! रामाचे नाम लिहिलेले दगडसुद्धा तरले जर तू त्या रामनामाचे स्मरण केल्याने कसा तरणार नाही ? अरे, त्या प्रभूची शरणागती घे !

अशा प्रकारे श्रीगुरुग्रंथसाहेबमध्ये मानव कल्याणाच्या प्रत्येक अंगाचा विचार केला गेला आहे व संपूर्ण मनुष्यजातीला सन्मार्गाने आपले जीवन व्यतीत करण्याचा उपदेश केलेला आहे.

**मुक्तीविषयी गुरुजी फरमान करतात :-**

**''सभ सुख दाता रामु है, दुसर नाही न कोई ।**

**कहु नानक सुना रे मना, तिह सिमरत गति होइ ।।''**

(श्री गु. ग्रं. सा. पान १४२६)

''अरे मानवा, प्रभूच्या नामाशिवाय मुक्ती देणारे कोणी नाही.''

गुरुदेवजी म्हणतात, ''हे मानवा, तू त्या प्रभू रामचंद्राच्या नामाचे स्मरण कर. ते केल्यानेच तुला मुक्ती मिळू शकेल.''

**श्रीअमृतसर**

शिखांचे चवथे गुरू गुरुरामदासजींनी अमृतसर या पवित्र धार्मिक स्थळ जे आज 'गोल्डन टेंपल' किंवा 'सुवर्णमंदीर' या नावाने ओळखले जाते. त्याचा पाया गुरुजींनी एका सूफी फकीर मियामीरच्या हस्ते घातला. या मंदिराच्या चारी दिशांनी चार दरवाजे यासाठी ठेवण्यात आले. याचा अर्थ हे शीख धर्माचे हरी मंदीर सर्व जाती, सर्व संप्रदाय तसेच चारी वर्णांच्या लोकांसाठी सदैव उघडे आहे.

**गुरु दशमेशजी (गुरु गोबिंदसिंघजी) सांगतात**

शिखांचे दहावे गुरु गोबिंदसिंघजी यांनी मुगल अत्याचाराने मरगळलेल्या व भयभीत झालेल्या समाजाला पाहून त्या समाजाच्या उद्धारासाठी व त्यांचे आत्मबळ वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केली.

**''सवासे एक लडाऊँ, तभै गोबिंदसिंघ नाम कहाऊँ''**

(दशम ग्रंथ)

त्याचप्रमाणे सन १६९९ वैशाख प्रतिपदेला संघटित केलेल्या शीख समाजातील 'खालसा शिष्य' म्हणजे संपूर्ण 'शुद्ध शिष्य' अर्थातच 'खरा शिष्य' याला अमृताची दीक्षा देऊन त्याच्या मनात शौर्याचे विचार संस्कारित केले व



त्याला 'खालसा' नाव प्रदान केले. खालसा जो आपल्या मनाने, शरीराने, कृतीने, आचरणाने पवित्र आहे. जो शौर्याचे प्रतिक आहे. मुगलांच्या अत्याचाराचा बिमोड करण्यासाठी आपल्या व जनतेच्या रक्षणासाठी धर्माचे पुनरुत्थानासाठी गुरुगोबिंदसिंघजींनी खालसा पंथाची निर्मिती केली. याच 'खालसा पंथाने' जगात इतिहास घडविला व आपल्या शौर्याने, बलिदानाने, त्यागाने अत्याचारी शासनाचा अंत करून मानवतेचा उद्धार केला आणि शिखांचे राज्य स्थापित केले.

श्री गुरु गोबिंदसिंघजींचे आपल्या खालसावर अतूट प्रेम व पूर्ण विश्वास होता. ते खालसाविषयी म्हणतात,

**''खालसा मेरो रुप है खास । खालसे हूं मैं करुँ निवास ।।''**

(दशम ग्रंथ)

खालसाच्या प्रामाणिकपणाबद्दल सांगतात :-

**''जब तक खालसा रहे निआरा, तब लग तेज दू मैं सारा ।।**

**जब अेह गहे बिपरन की रीत, मैं न करु इनकी परतीत ।।''**

(दशम ग्रंथ)

जोपर्यंत माझा खालसा शुद्ध आहे. पवित्र आहे. चांगल्या विचारसरणीचा आहे. तोपर्यंत मी माझी पूर्ण शक्ती व तेज त्याला प्रदान करेन; परंतु जर त्यांनी चुकीच्या रीतीरिवाजाचा अंगिकार केला, चुकीच्या मार्गावर जाऊ लागला तर मी त्यावर मुळीच विश्वास ठेवणार नाही.

**खालसा कसा असावा?**

**''रेहनी रहे सोई सिख मेरा, वो साहेब मैं उसका चेरा ।**

(दशम ग्रंथ)

जो शीख माझ्या विचारसरणीशी समरस असेल, तोच माझा शिष्य होय. केवळ शिष्य नव्हे तर माझा साहेब आहे. तो माझा मालक व मी त्याचा दास आहे.

आपली अंतिम वेळ जवळ आलेली पाहून गुरु गोबिंदसिंघजींनी सर्व शीख समजाला एकत्रित बोलावून त्यांच्या समक्ष ''श्री गुरु ग्रंथ साहेब'' यांच्यापुढे साष्टांग नमस्कार घातला व सर्व समाजाला संबोधित करून म्हणाले,

**''आज्ञा भईकल अकाल की तभै चलाइओ पंथ**

**सब सिखन को हुकूम है, गुरु मानयो ग्रंथ ।''**

अशा प्रकारे निर्वाणीचा सर्व शीख समाजाला ''श्री गुरु ग्रंथ साहिबा''च्या

हवाली करुन परलोकी गमन केले. तेव्हापासून आजपर्यंत शीख समाज श्रीगुरुग्रंथसाहेब यांनाच आपले गुरुचा सन्मान देतात व त्यांच्या हुकूमाप्रमाणे वागतात.

**शीख धर्माची काही वैशिष्ट्ये**

१) सर्व धर्मातील भेदभाव नष्ट करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे बसून एकाच पंगतीत भोजन करावे म्हणून गुरुनानकजींनी लंगर प्रथा सुरू केली.

२) सेवाभाववृत्तीने दुसऱ्यांची सेवा करावी या भावनेने शीख धर्मातील प्रत्येक व्यक्ती गुरुद्वारामध्ये जाऊन मनोभावे सेवा करतात. लंगर तयार करणे, झाडझूड करणे, भांडी धुणे, आलेल्यांचे जोडे स्वच्छ करणे यातून मनातील अहंभाव विसरुन विनम्र भावनेने गुरुचरणी लीन होण्याची शिकवण मिळते.

३) आपल्या मिळकतीचा दहावा भाग गुरुंसाठी राखीव ठेवला जातो. त्यातून समाजकल्याण होत आहे.

४) हा समाज कधीही भीक मागताना दिसणार नाही. तो कष्ट करतो व स्वाभिमानाने गुरुंनी दाखविलेल्या सन्मार्गाचे पालन करतो.

**समारोप**

जगातील कोणताही धर्म मानवाच्या नाशासाठी नाही तर प्रगतीसाठी, विकासासाठी आहे. डॉ. इकबाल म्हणतात, ''मजहब नहीं सिखाता, आपसमें बैर रखना''. आमचे राज्यकर्ते भोळ्या-भाबड्या जनतेला धर्माच्या नावाखाली चिथावणी देऊन कार्य करवून घेत आहेत. जर सर्व प्राणिमात्रांचे रक्त लाल आहे. सर्वांना दोन हात, दोन पाय, दोन डोळे दिले आहेत मग परमेश्वरामध्ये फरक कसा? आज आमच्या धार्मिक नेत्यांनी व राजकारणींनी जशी जमीन, संपत्ती, धनदौलतीची वाटणी केली त्याचप्रमाणे आमच्या देवांचीही त्यांनी वाटणी करून दिलेली आहे. पूर्वी मी अनुभवाने पाहिले आहे की, हिंदू-मुस्लिम भाई भाई होते. एकमेकांच्या सुखदु:खाचे ते साक्षी व प्रेमाने वागणारे, एकमेकांसाठी रडणारे होते. आज एकदम विचार कसे बदलले आहेत ज्या नेत्रात प्रेम, करुणा, दया तिथे आता त्याच डोळ्यातून अंगार निघत आहेत.

**खरंच आमच्या ३३ कोटी देवता होत्या का? तसे नसावे तर ती देवतुल्य माणसेच होती. ज्यांच्या मनात सर्व जाती धर्माबद्दल आदर**



**होता. ती होती आमच्या हिंदुस्थानची जनसंख्या.**

राम कहो या रहिम कहो मतलब तो प्रभु की पूजा से ।

सर्वांचे रस्ते वेगवेगळे असतील पण; शेवटी 'मंझिल' एकच आहे. श्रीज्ञानेश्वर माऊलीचे पसायदान विश्ववंदनीय आहे.

**'दुरितांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्मे सूर्ये पाहो ।**
**जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ।'**

अगदी असेच श्रीगुरुनानक देवांनी देखील सांगितलेले आहे.

**'नानक नाम चढदी कला, तेरे भाने सरबत दा भला'**

हे परमेश्वरा, तुझ्या नामाचा सदैव जयजयकार व्हावा व तुझ्या कृपाद्वारे सर्व जगाचे कल्याण व्हावे हीच तुझ्या चरणी प्रार्थना आहे.

अशा प्रकारे शीख धर्माची स्थापना अत्याचारांचा विनाश करून देश संरक्षणाच्या व अबलांच्या संरक्षणाच्या भावनेतून झाली होती. आजही आपल्या भारतीय संरक्षण दलामध्ये पाहिले तर शीख धर्मातील तरुणांची संख्या तुलनेने मोठी दिसते. संरक्षण दलामध्येही हीच स्थिती आहे. खालसा हे शौर्याचे, संसंरक्षणाचे प्रतीक आहे. व तो आज ही सीमेवर देशाचे संरक्षण करताना सर्वांत पुढे आहे.

आपल्यासारख्यांशी संवाद साधून, माझ्या धर्माविषयी आपल्याशी सत्संगात बोलता आले हे माझे मी भाग्य समजतो. धन्यवाद !

वाहिगुरु जी कारवालसा ।। वाहिगुरु जी की फतेह ।।

**तारासिंघ गोरोवाडा**
सिख धर्मप्रचार कमिटी, पुणे.
१०३७ धनकवडी, राजमुद्रा गृहरचना,
सी ब्लॉक १ समोर, पुणे ४११०४३
भ्रमणध्वनी : ९८२२८६७७७८

॥ १ ओंकार सतिगुर प्रसादि ॥

## सिख धर्म प्रचार कमिटी, पुणे.

१०३७ धनकवडी, पुणे ४११०४३
नोंदणी क्र. ई ४५५७ पुणे.
तारीख २६.४.२००६

### सन्माननीय सदस्य

१. अध्यक्ष : सरदार गुरनामसिंघ जैमलसिंघ होरा
२. कार्याध्यक्ष : सरदार तारासिंघ गु. गोरोवाडा
३. खजिनदार : सरदार कुलजितसिंघ अत्तरसिंघ चौधरी
४. : सरदार चरणजितसिंघ जसवंतसिंघशाहनी
५. : स्व. विनायक लिमये
६. : सरदार इकबालसिंघ ता. गोरोवाडा



# शीख धर्माचे उपदेश व जीवन संदेश

लेखक
तारासिंघ गोरोवाडा